# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

**विषय - शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करिता पारंपारिक अभ्यासक्रमांच्या शेवटच्या तुकडीच्या मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा ४०% ज्यादा विद्यार्थी मागणी प्रस्तावाबाबत.**

**टीप- या कार्यालयाचे संदर्भ क्र. संलग्नता टी-२/३५ दि. २९/०६/२०१७ रोजीचे परिपत्रक रद्द करण्यात आले आहे**

दरवर्षी १२ वी परिक्षेच्या निकाल मोठया प्रमाणात लागत असलेमुळे कला, वाणिज्य व विज्ञान (बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी.) पदवी अभ्यासक्रमांसाठी प्रथम वर्षाकरीता उपलब्ध विद्यार्थी संख्या विचारात घेता कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयामध्ये विद्यार्थी प्रवेशाबाबत निर्माण झालेली स्थिती विचारात घेवून विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहू नयेत यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६, कलम ११० (३) (ग) नुसार विद्यापीठाकडून खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेले आहेत.

**संलग्नीत महाविद्यालयाच्या मागणीनुसार शैक्षणिक वर्ष २०१५-१६व २०१६-१७ करिता ज्या महाविद्यालयांना पारंपारिक पदवी अभ्यासक्रमांसाठी मंजुर शेवटच्या तुकडीच्या ४०% जादा विद्यार्थी किंवा तात्पुरती अतिरिक्त तुकडी मंजुर करण्यात आली आहे अशा महाविद्यालयांना अनुक्रमे तृतिय व द्वितिय वर्षाकरिता तसेच, शैक्षणिक वर्ष २०१७-१८ साठी प्रथम वर्षाकरिता शासन मान्य मंजुर शेवटच्या तुकडीच्या ४०% जादा विद्यार्थी प्रवेशित करणेस खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येईल**

१. मूल्यांकन/पुनर्मूल्यांकनाकरिता पात्र महाविद्यालयांच्याबाबतीत. नॅक/एनबीए मानांकन व मूल्यांकन तसेच पुनर्मुल्यांकन असणे आवश्यक आहे.

२. संबंधित महाविद्यालयाच्या प्राप्त प्रस्तावानुसार संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रथम/द्वितिय/तृतिय वर्षाच्या सन २०१७-१८ या एकाच शैक्षणिक वर्षाकरिता महाविद्यालयास शासन मान्य शेवटच्या तुकडीच्या प्रवेश क्षमतेच्या ४०% वाढीव विद्यार्थी प्रवेशित करण्यास मान्यता देण्यात येईल.

३. प्रवेश प्रक्रिया राबवताना शासनाच्या आरक्षण धोरणाचे तंतोतंत पालन करण्यात यावे.

४. एकाच शहरात/गावात एकापेक्षा अधिक महाविद्यालये असतील तर नजिकच्या महाविद्यालयाकडून ४०% जादा विद्यार्थी प्रवेशासंदर्भात संबंधित महाविद्यालयाने नजिकच्या महाविद्यालयाचे ना-हरकत पत्र सादर करणे आवश्यक आहे.

५. ज्या महाविद्यालयास ४०% वाढीव विद्यार्थी प्रवेशित करण्यास देण्यात येणार आहे, अशा महाविद्यालयांनी त्यासाठी लागणा-या पायाभूत सुविधा, शिक्षक यांची उपलब्धता करून देणे आवश्यक आहे. **ही मान्यता शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पुरतीच मर्यादीत असून विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्वानुसार प्रवेशित विद्यार्थ्यांची १८० शैक्षणिक दिवस हजेरी भरेल याची जबाबदारी संपुर्णत: महाविद्यालयाची राहील** आणि या पोटी शासन व विद्यापीठ कोणताही आर्थिक भार उचलणार नाही, याची नोंद घेण्यात यावी.

६. सध्या इ. १२ वी चे वाढीव निकाल अवलोकनी घेता भविष्यात पुन:पुन्हा अशी परिस्थिती उदभवू नये म्हणून महाविद्यालयाने आवश्यकतेनुसार शासन मान्यतेच्या कायमस्वरूपी अतिरिक्त वाढीव तुकडयांसाठी रितसर प्रस्ताव विहीत मुदतीत विद्यापीठास व शासनास सादर करणे आवश्यक आहे. यानुषंगाने जी महाविद्यालये रितसर प्रस्तावान्वये तुकडयांची मागणी करणार नाहीत, अशा महाविद्यालयांना येथून पुढे तात्पुरत्या अतिरिक्त तुकडया देता येणार नाहीत.

**टिप :-१)बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी. या अभ्यासक्रमाच्या ४०% ज्यादा विद्यार्थी संख्येच्या मान्यतेसाठी प्रत्येकी रू. ७२०/- प्रस्ताव शुल्क स्वतंत्रपणे आकारण्यात येईल,**

**२)ज्यादा विद्यार्थी प्रवेशाबाबत शासकीय अनुदान मिळणार नाही, याची महाविद्यालयांनी नोंद घ्यावी.**

**३)वाढीव विद्यार्थी प्रस्ताव सोबतच्या नमुन्यामध्ये विहीत शुल्कासह दि. १५/०७/२०१७ पर्यत विद्यापीठास सादर करावेत.**

**४)शासन मान्य मंजुर शेवटच्या तुकडीच्या ४०% जादा विद्यार्थी प्रवेशित करणे बाबतचे प्रस्ताव सोबतच्या नमुन्यामध्ये सादर करावेत.**

**५)अपुरे अथवा विलंबाने आलेले प्रस्ताव कोणत्याही परिस्थितीत स्वीकारले जाणार नाहीत, याची प्राचार्यांनी नोंद घ्यावी.**

**६)सोबत जोडलेल्या नमुन्यामध्येच प्रस्ताव स्वीकारले जातील.**

**७)ज्या महाविद्यालयांना मागील शैक्षणिक वर्षामध्ये वाढीव विद्यार्थी क्षमता/अतिरिक्त तात्पुरती तुकडी मंजूर केली आहे त्याची प्रत सोबत जोडावी.**

कळावे.

आदेशान्वये

I/c उपकुलसचिव
संलग्नता टी-२ विभाग

**संदर्भ क्र./संलग्नता/टी-२/** 47
**दि.** 10 JUL 2017
**प्रति,**
**मा. प्राचार्य,**
**सर्व संलग्नित कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालये**

# प्रस्तावाचा नमुना

संदर्भ -

प्रति,
मा. कुलसचिव
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विषय - ४०% जादा विद्यार्थी मान्यतेबाबत.
संदर्भ - शिवाजी विद्यापीठ परिपत्रक संदर्भ क्र.

महोदय,

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ साठी आमच्या महाविद्यालयामधील खालील अभ्यासक्रमांच्या **४०% ज्यादा विद्यार्थी प्रवेशित करण्यास मान्यता मिळणे आवश्यक आहे.**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **संस्थेचे/महाविद्यालयाचे नाव :-** | | | | | | |
| | **अभ्यासक्रमाचे नाव** | **भाग** | **शासनमान्य मंजूर तुकडी** | | **मंजूर विद्यार्थी संख्या** | | **भरणा केलेल्या शुल्काचा तपशील (रू.)** |
| | | | अनुदानित | विनाअनुदानित | अनुदानित | विनाअनुदानित | |
| | **बी.ए.** | | | | | | |
| | **बी.कॉम.** | | | | | | |
| | **बी.एस्सी.** | | | | | | |
| २ | **सादर केलेली कागदपत्रे -** | | | | | | |
| i) | नजिकच्या महाविद्यालयामधील उपरोक्त अभ्यासक्रमांसाठी असलेल्या मंजूर प्रवेश क्षमतेवर परिणाम होणार नसल्याबाबत संबंधित महाविद्यालयाचा ना-हरकत दाखला. | | | | | | |
| ii) | उपरोक्त अभ्यासक्रमांसाठी कार्यभारानुसार आवश्यक ते शिक्षक तात्काळ भरण्यात येतील याबाबतचे संस्था अध्यक्ष किंवा सचिव व प्राचार्य यांचे संयुक्त हमीपत्र. | | | | | | |
| iii) | उपरोक्त अभ्यासक्रमांसाठी आवश्यक त्या पायाभूत सुविधा महाविद्यालयामध्ये उपलब्ध असल्याबाबत संस्था अध्यक्ष किंवा सचिव व प्राचार्य यांचे संयुक्त हमीपत्र. | | | | | | |
| iv) | ज्यादा विद्यार्थी प्रवेशाबाबत भविष्यात शासकीय अनुदान मागणी करण्यात येणार नाही याबाबत रू. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर संस्था अध्यक्ष किंवा सचिव व प्राचार्य यांचे संयुक्त हमीपत्र. | | | | | | |
| v) | सदर प्रस्तावास मिळणारी मान्यता शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करिता मर्यादीत असून विद्यार्थ्यांच्याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्वानुसार प्रवेशित विद्यार्थ्यांची १८० शैक्षणिक दिवस हजेरी भरेल याची दक्षता घेण्याबाबतचे प्राचार्यांचे हमीपत्र. | | | | | | |

उपरोक्त प्रस्तावास विद्यापीठ मान्यता मिळावी ही विनंती.

**आपला विश्वासू,**

**प्राचार्य,**
**(सही व शिक्का)**